
# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)



ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर

## ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन, लातूर

































# सिध्देश्वर रत्न

स्मरणिका - २०२५

# ज्येष्ठ नागरिक संघ
## कार्यकारिणी २०२१-२०२६
### यजमान संघ




अभि. आर. बी. जोशी
अध्यक्ष



श्री. प्रकाश घादगिने
सचिव



श्री. शहाजी घाडगे
सहसचिव




डॉ. काशीनाथराव सलगर
कार्याध्यक्ष



श्री. वसंत बेंडे
कोषाध्यक्ष



श्री. प्रकाश निला
सदस्य



श्री. रमेश भोयरेकर
सदस्य




डॉ. भास्कर बोरगावकर
सदस्य



सौ. शकुंतला यादव
सदस्य



डॉ. बी. आर. पाटील
सदस्य



श्री. सुधीर बाजी
सदस्य



श्री. रामानुज रांदड
निमंत्रित सदस्य



प्रा. पुरुषोत्तम कुलकर्णी
निमंत्रित सदस्य



डॉ. सी. एन. जोशी
निमंत्रित सदस्य



डॉ. आर. के. पाटील
निमंत्रित सदस्य



अभि. देविकुमार पाठक
निमंत्रित सदस्य



Devendra Fadnavis
Chief Minister
Maharashtra

Mantralaya
Mumbai 400 032

दि. ०१ जानेवारी, २०२५

# शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे होत असल्याचे समजून आनंद झाला. या अधिवेशनात सहभागी होत असलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे, संस्थांचे तसेच आयोजकांचे हार्दिक अभिनंदन करतो!

'महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ' राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवत आहे याचा मला विशेष आनंद आहे. ज्येष्ठ नागरिक समाजाचे मार्गदर्शक आणि अनुभवसंपन्न आधारस्तंभ आहेत असे मी मानतो. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील अनुभव, मूल्य आणि ज्ञान नवीन पिढ्यांना प्रेरणा देणारे असते. आपली संस्कृती, परंपरा पुढील पिढीपर्यंत घेऊन जाण्याचा हा सेतू आहे आणि तो कायम मजबूत राहायला हवा, यासाठी राज्य शासन निर्णायक प्रयत्न करत आहेच, परंतू महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघासारख्या संस्था या कामात सक्रीयपणे सहभागी आहेत ही प्रशंसनीय बाब आहे. लातुर येथे होत असलेल्या अधिवेशनात ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांसोबतच त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा समाजासाठी कसा उपयोग करून घेता येईल या दृष्टीने सकारात्मक चर्चा होईल, अशी आशा आहे.

या अधिवेशनानिमित्त प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेसाठी तसेच आपल्या सर्वांच्या आरोग्यपूर्ण, आनंदमयी आणि उत्साही जीवनासाठीही खूप शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

Tel. : 022-2202 5151/2202 5222, Fax : 022-2202 9214
E-mail : cm@maharashtra.gov.in, Website : www.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते



# उप मुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

0 3 JAN 2025

## शुभेच्छा

लातूर येथे होणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या राज्यस्तरीय अधिवेशनात महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ स्मरणिका प्रकाशित करत असल्याचे समजून आनंद झाला.

ज्येष्ठ नागरिकांच्या हितार्थ काम करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या संघटनेचे कार्य मोलाचे आहे. संघाने इतर अनेक ज्येष्ठ नागरिक संघ तयार केले असून या संघटनांशी लाखो ज्येष्ठ नागरिक जोडले गेले आहेत. संघटनेचा हा यशाचा वाढता आलेख कौतुकास्पद आहे.

अधिवेशनातील चर्चासत्रांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नासंदर्भात चर्चा होईल. त्यामूळे ज्येष्ठ नागरिकांसाठी ती महत्वाची ठरेल. स्मरणिकेमुळे संघटनेच्या कामाची माहिती मिळण्यास मदत होईल. ज्येष्ठ नागरिकांच्या या राज्यस्तरीय अधिवेशनास व प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेस मनःपूर्वक शुभेच्छा!

(एकनाथ संभाजी शिंदे)



सत्यमेव जयते

# उप मुख्यमंत्री

## महाराष्ट्र राज्य

दि. १ जानेवारी २०२५.

### शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघाचे (फेस्कॉम) ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे आयोजित करण्यात आल्याचे समजून अत्यंत आनंद झाला. या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेच्या उपक्रमास मनःपूर्वक शुभेच्छा!

ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे अनुभवसंपन्न मार्गदर्शक असून, त्यांचे ज्ञान, अनुभव आणि जीवनमूल्ये समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. या अधिवेशनाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि त्यांच्या कल्याणासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा होईल, ही अत्यंत प्रशंसनीय बाब आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी 'महायुती' सरकार सदैव कटिबद्ध आहे. त्याचाच भाग म्हणून सरकारने ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एसटीचा मोफत प्रवास', 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना', 'मुख्यमंत्री वनश्री योजना' यांसारख्या अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन नव्या योजना आणि उपक्रम राबविण्यासाठी 'महायुती' सरकार प्राधान्याने प्रयत्नशील आहे.

समाजात ज्येष्ठ नागरिकांचे योगदान अधोरेखित करण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी ज्येष्ठ नागरिक संघाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून दिले जाणारे विचार व ठराव निश्चितच उपयुक्त ठरतील. लातूर येथे होणारे महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघाचे (फेस्कॉम) राज्यस्तरीय अधिवेशन यशस्वी होवो, तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी नवे दृष्टिकोन आणि सकारात्मक पावले पुढे पडोत, अशी मनःपूर्वक शुभेच्छा!

(अजित पवार)

**Dr. Shivaji B. Kalge**
Member of Parliament ( Lok Sabha )
Latur Constituency- Maharashtra

**डॉ. शिवाजी बं. काळगे**
संसद सदस्य (लोकसभा)
लातूर, महाराष्ट्र.

जावक : १३ /२०२५ ०३ जानेवारी २०२५

# शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) च्या लातूर संघाला ३४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचा यजमान होण्याची जबाबदारी मिळाल्यामुळे हे अधिवेशन लातूर नगरीत दि. ११ व १२ जानेवारी २०२५ रोजी होत आहे. याचा मला स्वागताध्यक्ष म्हणून मनःस्वी आनंद होत आहे.

ज्येष्ठ नागरिक संघाचे काम मी जवळून पहात आलो आहे. ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, आरोग्य शिबीर, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. लातूर संघाने महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांना लातूरच्या भूमीत आमंत्रित करण्याचे काम केले आहे. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी झटणाऱ्या सर्व 'जेष्ठ कार्यकर्त्यांचे' मी अभिनंदन करतो. अधिवेशनाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्या व प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या अधिवेशनाचा उपक्रम प्रशंसनीय व अनुकरणीय आहे.

या अधिवेशनात जेष्ठ नागरिकांच्या, समस्या, अडचणी, सोई, सुविधा बाबत चर्चा होईल अशी आशा आहे. या निमित्त काढण्यात येणारी स्मरणिका संग्रही ठेवावी अशी होईल अशीही मी आशा व्यक्त करतो.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या या ३४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनास येणाऱ्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे मी स्वागत करतो आणि यजमान ज्येष्ठ नागरिक संघ, लातूरच्या वाटचालीस मी शुभेच्छा देतो.



डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे
खासदार, लातूर लोकसभा

Residence : Laxmi Netralaya and Maternity Home (Kalge Hospital), Netaji Nagar, Latur-413512
Email : Kalgeshivaji@rediffmail.com , Drshivajikalgeproffice@gmail.com Ph. 02382-224325

मंत्री
सहकार
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in



दिनांक : 02.09.2024

# शुभेच्छा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अधिवेशनाला मी हार्दिक शुभेच्छा देतो. हे अधिवेशन आपल्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या एकजुटीचे प्रतीक आहे. यासारख्या मंचावर एकत्र येणे, आपली दृष्टी, आपली समस्या आणि आपल्या हक्कांची जाणीव करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी आणि कल्याणासाठी सुरू केलेले आपले कार्य निश्चितच समाजाला समृद्ध करते, आणि आपल्या योगदानामुळे आपला समाज आणखी प्रगल्भ आणि सशक्त बनत आहे.

आपला जीवन अनुभव, ज्ञान आणि आपली शिकवण समाजासाठी अनमोल आहे. आपल्या या अनुभवांचा आधार घेऊन, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात ज्येष्ठ नागरिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार केली आहे. आपल्या मार्गदर्शनामुळेच नवीन पिढीला धडपडायला, शिकायला आणि योग्य निर्णय घ्यायला शिकता येते. त्यामुळेच आपल्या महासंघाने जे धाडसी आणि महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, ते निश्चितच समृद्ध समाज निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. महासंघाच्या कार्याने विविध पातळ्यांवर ज्येष्ठ नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित आणि समृद्ध बनवले आहे. त्यांनी आरोग्य, सुरक्षा, शालेय व वृद्धापकाळातील लाभांसाठी केलेल्या कार्यामुळे एक सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. आपली एकजूट, सामूहिक प्रयत्न आणि आपला संघर्ष यामुळेच अनेक महत्त्वाच्या अधिकारांचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळालेला आहे. आपल्याला अधिकार मिळवण्यासाठी केलेल्या संघर्षाच्या किमतीला कधीही कमी लेखता येणार नाही.

हे अधिवेशन फक्त एक औपचारिक सभा नाही, तर या मंचावर आपल्याला अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्याची, एकमेकांना समजून घेण्याची आणि आपला दृष्टिकोन मांडण्याची संधी मिळते. त्याचप्रमाणे, हा एक असा अवसर आहे, ज्याद्वारे आपल्याला समाजाच्या इतर घटकांसोबत आपले विचार सामायिक करण्याची आणि आपला आवाज उचलण्याची संधी मिळते.

माझ्या सर्व ज्येष्ठ नागरिक मित्रांना आणि त्यांच्या कुटुंबियांना जीवनातील प्रत्येक क्षेत्रात सशक्त, समृद्ध आणि आनंदी भविष्याची शुभेच्छा. आपल्या महासंघाच्या पुढील कार्यांमध्ये यश मिळो आणि आपण सर्वांनी एकत्र येऊन समाजासाठी सकारात्मक बदल घडवू.

(बाबासाहेब पाटील)

सत्यमेव जयते




# अमित विलासराव देशमुख

आमदार, महाराष्ट्र


## शुभेच्छा

ज्येष्ठ नागरीक संघ, लातूर च्या वतीने महाराष्ट्र ज्येष्ठ नागरीक महासंघ (फेस्कॉम) चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन दि. ११ व १२ जानेवारी २०२५ दरम्यान लातूर येथे आयोजीत करण्यात आले आहे. हे समजून आनंद वाटला.

ज्येष्ठ नागरिक संघ गेल्या दोन दशकांपासून ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर, अध्यात्मीक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व विविध लोकोपयोगी अभियान राबवित आहे. या संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरीकांच्या विविध मागण्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. आपला हा उपक्रम अनुकरणीय आणि स्तुत्य असाच आहे.

ज्येष्ठ नागरिक संघामार्फत घेण्यात येणाऱ्या अधिवेशनात ज्येष्ठ नागरीकांच्या समस्य व त्यांच्या अडचणी व शासनाकडून नागरीकांच्या अपेक्षा यावर मंथन केले जाईल. तसेच यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत ज्येष्ठ नागरीकांसाठी उपयुक्त माहिती प्रकाशित करण्यात येईल आणि ही स्मरणिका संग्राह्य ठरेल, अशी आशा मी व्यक्त करतो. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरीक महासंघ (फेस्कॉम) चे ३४ व्या अधिवेशनास, या अधिवेशनाच्या निमित्ताने लातूर नगरीत येणाऱ्या सर्व नागरीकांस आणि ज्येष्ठ नागरीक संघ, लातूरच्या वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा!

आपला,

(अमित विलासराव देशमुख)


लातूर ऑफीस : पोस्ट बॉक्स क्र. ३, लातूर ४१३५३१, महाराष्ट्र टेलीफोन ९१.२३८२.२२३९०१ फॅक्स ९१.२३८२.२२३९००

मुंबई ऑफीस : पोस्ट बॉक्स क्र. ३३०, मुंबई ४००००१, महाराष्ट्र टेलीफोन ९१.२२.२२८५३३३३ फॅक्स ९१.२२.२२८८३७३७

मोबाईल ९१.९८७०६३३३३३ ईमेल office@amitvilasraodeshmukh.com

महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा
महाराष्ट्र

आ. रमेश काशीराम कराड
234-लातूर ग्रामीण विधानसभा

जा.क्र./162/2025

दिनांक: 05 /01 /2025

## !! शुभेच्छा !!

भारतीय सांस्कृतीत जेष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. महाराष्ट्र जेष्ठ नागरीक महासंघाचे अधिवेशन सर्व जेष्ठ नागरिकांच्या एकजुटीचे प्रतीक आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांच्या आचार विचाराचे आदान प्रदान होण्यासाठी मोठी संधी आहे. आपली दृष्टी, आपली समस्या आणि आपल्या हक्कांची जाणीव अधिवेशनातून होईल यात शंका नाही. जेष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी आणि कल्याणासाठी सुरु केलेले महासंघाचे कार्य निश्चितच समाजाला समृद्ध करते.


आयुष्यभर आलेल्या सकारात्मक आणि नकारात्मक अनुभवाच्या माध्यमातून आपले मार्गदर्शन आणि शिकवण समाजासाठी अनमोल आहे. आपल्या मार्गदर्शनातून देश हिताबरोबरच समाज हितासाठी नवीन पिढीला धडपडायला, योग्य निर्णय घ्यायला मदत होईल. आपली एकजूट, सामूहिक प्रयत्न आणि आपला संघर्ष यामुळेच अनेक महत्वाच्या अधिकारांचा लाभ जेष्ठ नागरिकांना मिळालेला आहे हे नाकारता येत नाही. जेष्ठ नागरिकांच्या सहय्यासाठी आणि त्यांच्या मदतीसाठी राज्य शासन आणि केंद्र शासन विविध योजना राबवत आहे.

महासंघाचे हे अधिवेशन फक्त एक औपचारिक सभा नाही, तर या मंचावर आपल्याला अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्याची, एकमेकांना समजून घेण्याची आणि आपला दृष्टीकोन मांडण्याची संधी आहे. सर्व जेष्ठ नागरिक मित्रांना आणि त्यांच्या कुटुंबियांना जीवनातील प्रत्येक क्षेत्रात सशक्त, समृद्ध आणि आनंदी भविष्याच्या माझ्याकडून शुभेच्छा. महासंघाच्या पुढील कार्यास यश मिळो या आपेक्षेसह महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघाच्या अधिवेशनास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !!



आ. रमेश कराड
विधानसभा सदस्य

निवास : "प्रयाग निवास" विश्वनाथपूरम्, एम.आय.टी. परिसर, अंबाजोगाई रोड, लातूर - 413531
Email: rkkarad@gmail.com मो. नं. 98224323



सत्यमेव जयते

# संभाजी पाटील निलंगेकर

## विधानसभा सदस्य

5 JAN 2025

**। शुभेच्छा ।**

लातूर येथील महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन आपण साजरी करीत आहात हे समजुन आनंद वाटला.

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ गेल्या चार दशकापासून जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर, अध्यात्मीक, शैक्षणीक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व विविध लोकोपयोगी अभियान राबवित आहे. या संस्थेच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांच्या विविध मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. आपला हा उपक्रम अनुकरणीय आणि स्तुत्य असाच आहे.

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघामार्फत प्रकाशित करण्यात येणा-या स्मरणिकेत जेष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त माहिती प्रकाशित करण्यात येईल आणि ही स्मरणिका संग्राहय ठरेल, अशी आशा मी व्यक्त करतो. संस्थेच्या पुढील वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

(संभाजी पाटील निलंगेकर)

एल.आय.सी. कॉलनी, रिंग रोड, लातूर - ४१३ ५१२. फोन नं. ०२३८२-२२६९९९

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद महाराष्ट्र

# आ.विक्रम वसंतराव काळे

( औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ )
पंचायतराज समिती सदस्य
प्रांताध्यक्ष,महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)चे जेष्ठ नागरिक संघ,लातुर आयोजित लातूर येथील दि. 11 व 12 जानेवारी 2025 या कालावधीत होणारे 34 वे राज्यस्तरीय जेष्ठ नागरिक संम्मेलनास माझ्या हार्दीक शुभेच्छा!..हे अधिवेशन आपल्यातील सर्व जेष्ठ नागरिकांच्या एकजुटीचे प्रतिक आहे.यासारख्या मंचावर एकत्र येणे,आपली दृष्टी,आपली समस्या आणि आपल्या हक्कांची जाणीव करणे हे अत्यंत महत्वाचे आहे.जेष्ठ नागरिकांच्या सन्मानासाठी आणि कल्याणासाठी सुरू केलेले आपले हे कार्य निश्चितच समाजाला समृध्द करणारे आणि आपल्या योगदानामुळे आपला समाज आणखी प्रगल्भ आणि सशक्त बनेल.

आपला जीवन अनुभव,ज्ञान आणि आपली शिकवण समाजासाठी अनमोल आहे.आपल्या अनुभवाचा आधार घेऊन,समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात जेष्ठ नागरिकांनी महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे.महासंघाच्य कार्याने विविध पातळयावर जेष्ठ नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित आणि समृध्द बनवले आहे. आपली एकजुट,सामुहिक प्रयत्न आणि आपला संघर्ष यामुळेच अनेक महत्वाच्या अधिकारांचा लाभ जेष्ठ नागरिकांना मिळालेला आहे.

जेष्ठ नागरिकांचे हे अधिवेशन म्हणजे फक्त एक औपचारिक सभा नसुन या मंचावर आपल्याला अनेक मुद्यांवर चर्चा,एकमेकांना समजुन घेण्याची आणि आपला दृष्टीकोन मांडण्याची संधी मिळते.

महाराष्ट्रातील सर्व जेष्ठ नागरिकांना व राज्यस्तरीय जेष्ठ नागरिक संमेलनास व या निमित्ताने प्रकाशित होणा-या स्मरणिकेस मराठवाड्यातील तमाम शिक्षक बंधु-भगिनी,शिक्षकेतर कर्मचारी, महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ व काळे परिवाराच्या वतीने मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा...

शनिवार ०४ जानेवारी २०२५



आपला स्नेहांकित

(आ. विक्रम वसंतराव काळे)

कार्यालय ! वसंत विहार' महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी,बार्शी रोड ...
08208810044 ...

वर्षा ठाकूर - घुगे ( भा.प्र.से. )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, लातूर

Varsha Thakur - Ghuge ( I.A.S.)
Collector & District Magistrate, Latur

जा.क्र.२०२५/पी.ए./कावि-०१ दिनांक ०२/०१/२०२५

// शुभेच्छा पत्र //

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघाचे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे होत आहे. या गोष्टीचा आनंद आहे. या अधिवेशनात महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिक सहभागी होत असलेल्या सर्व जेष्ठ नागरिकांचे संघाचे तसेच आयोजक यजमान संघ म्हणून जेष्ठ नागरिक संघ, लातूर यांचे हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ ग्रामिण व शहरी भागातील जेष्ठ नागरिकासाठी विविध उपक्रम राबवत आहे याचा मला विशेष आनंद आहे.

लातूर येथे होत असलेल्या अधिवेशनात जेष्ठांच्या प्रश्ना सोबत त्यांच्या अनुभवाचा ज्ञानाचा समाजासाठी उपयोग नक्कीच होईल अशी आशा आहे.

या अधिवेशनाच्या निमित्त प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेसाठी तसेच आपल्या सर्वांच्या आरोग्यपुर्ण, आनंदमयी आणि उत्साही जीवनासाठी खूप-खूप शुभेच्छा.!



वर्षा ठाकूर-घुगे,(भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, लातूर.

Office Of The Collector, New Collector Office Building, Barshi Road, Latur- 413512 Maharashtra
**Tel.No.** 02382 224001 ( Office ), 221001 ( Resi.), 222330 (fax)
**e-mail:** laturcollector@gmail.com , collector.latur@maharashtra.gov.in